वर्ष ८ वे

अंक २ रा

स्त्री गुलाम झाली की मुले गुलाम होतात।
मुले गुलाम झाली की समाज गुलाम होतो।
समाज गुलाम झाला की राष्ट्र गुलाम होते।।

- स्त्री मुक्ति व स्वावलंबन अभियान




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : २६.०३.१९८०)

यांचे मुखपत्र

# संवाद

(त्रैमासिक)

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २००८

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

# संपादकीय

प्रिय सभासद,

सर्वप्रथम सन २००८ या नवीन वर्षासाठी आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा ! नवीन वर्षामध्ये आपणास उत्तम प्रकृती, भरपूर धनसंपत्ती लाभो तसेच संपूर्ण जगाचे ज्ञान प्राप्त होवून त्यातून आपली सर्वांगीण प्रगती व्हावी अशी शुभकामना व्यक्त करतो. नियमित व्यायाम, योगा व योग्य आहार यांचेद्वारा स्वतःला सुदृढ ठेवण्याचा आपण संकल्प करुया !

मागील अंकामध्ये आपल्या पारनेर तालुका मित्र मंडळाने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा आपण थोडक्यात आढावा घेतला होता. त्या अनुषंगानेच पुढील करावयाच्या कामांचा आलेख मी थोडक्यात आपल्यापुढे सादर करीत आहे.

आपण चिंचवड (थेरगाव) येथील आपल्या मालकीच्या ५००० चौ.फूट जागेच्या प्लॉटमध्ये बांधावयाच्या प्रस्तावित विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीच्या नकाशास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून नुकतीच मंजुरी मिळाली असून आता साधारण एक ते दीड महिन्यामध्ये प्रस्तावित बांधकामास सुरुवातही होत आहे. **आपल्यापैकी बऱ्याच सभासदांनी काम सुरु झाले की आम्ही देणगी देऊ असे कबूल केले आहे. त्यामुळे त्यांना नम्रपणे मी असे सांगू इच्छितो की, आता ती वेळ आली आहे.** आपण प्रत्यक्ष कामाच्या जागेवर येऊन खात्री करावी म्हणजे आपण देत असलेल्या देणगीतील प्रत्येक पैशाचा योग्य कारणासाठी उपयोग होत असल्याची आपलीही खात्री होईल.

आपल्या मंडळाने विद्यार्थ्यांसाठी खास मार्गदर्शन करण्याचे ठरविले आहे. त्याचाच भाग म्हणून दि. ३० नोव्हेंबर, १ व २ डिसेंबर २००७ रोजी पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व अंजना मेडिकल आणि सोशल फौंडेशन, भोसरी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुक्यातील **टाकळी ढोकेश्वर, पारनेर** व **निघोज** येथे १०वी व १२वी च्या विद्यार्थ्यांना 'नंतर काय ?' याबाबत विशेष मार्गदर्शन प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन केले. या शिबीराचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या त्या त्या क्षेत्रातील तज्ञ / वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अपेक्षित परिणाम तर झालाच, शिवाय या शिबीरासाठी विद्यार्थी व शिक्षक यांचेकडूनही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. अशाच प्रकारचे उपक्रम आता मंडळाकडून राबविले जात आहेत. त्यामुळे मंडळाची पुण्यातील तसेच आपल्या तालुक्यातील सभासदांच्या तसेच नागरिकांच्या मनातील प्रतिमा निश्चितच आणखी उंचावत आहे. मंडळाचे अध्यक्ष व कार्यकारिणी सभासद यांना याबाबत धन्यवाद दिले पाहिजेत.

मंडळाच्या आवाहन पत्रकात नमूद केल्याप्रमाणे आपणास आपल्या ऐपतीप्रमाणे काही ना काही तरी योगदान देऊन आपल्या ग्रामीण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी करीत असलेल्या प्रयत्नांना दाद द्यावी व सहकार्य करावे, अशी अपेक्षा संपादकीय समारोप करताना व्यक्त करतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ढुबे**
संपादक

# नववर्ष २००८ च्या
## आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे.**

# पारनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन शिबीराचे यशस्वी आयोजन

अंजना मेडिकल आणि सोशल फौंडेशन, भोसरी व पारनेर तालूका मित्र मंडळ, पुणे यांच्या संयुक्त सहकार्याने दि. ३०.११.२००७ ते २.१२.२००७ या कालावधीत पारनेर तालूक्यात तीन दिवसांचे ''शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शन शिबीर'' इ. १० वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. या शिबीरामध्ये प्रशासन, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, शैक्षणिक व सैन्यदल अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंत तज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन श्री.विश्वनाथ कोरडे, संस्थापक अध्यक्ष, अंजना मेडिकल अँड सोशल फौंडेशन ट्रस्ट, भोसरी व मंडळाचे अध्यक्ष श्री. हौसाराम घोडके यांनी केले.

दि. ३०.११.०७ रोजी टाकळी ढोकेश्वर येथे पहिले शिबीर जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. सिताराम खिलारी सर यांचे अध्यक्षतेखाली जवाहर नवोदय विद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले. या मार्गदर्शन शिबीरासाठी परिसरातील १२०० विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने कर्जुले हर्या, वासुंदे, खडकवाडी, पिंपळगाव रोठा, वनकुटे, टाकळी ढोकेश्वर व परिसरातील सर्व विद्यालये सहभागी झाली होती. या शिबिराचे उद्‌घाटन प्रसिध्द चित्रपट निर्माते व दिग्दर्शक श्री. केदार शिंदे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी सर्व सन्माननीय वक्त्यांची प्रवेशद्वारापासून ढोल लेझिमच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंजना मेडिकल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. विश्वनाथ कोरडे यांनी केले. कार्यक्रमाचा उद्देश व आवश्यकता त्यांनी विशद केली. पहिल्या सत्रामध्ये श्री संपत डावखर, उपजिल्हाधिकारी पुणे यांनी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना स्पर्धा परीक्षा व रोजगाराच्या संधी या विषयाबाबतचे मार्गदर्शन केले. यानंतर प्रसिध्द चित्रपट निर्माते श्री केदार शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रथम आपले पदवीपर्यंतचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

दुसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाचे पुणे विद्यापीठाचे प्रमुख प्रा.डॉ. संभाजीराव पठारे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनातील न्यूनगंड काढून जिद्दीने स्पर्धा परीक्षेस कसे सामोरे जावे हे सांगितले. त्याचप्रमाणे इंग्रजी भाषा कशी अवगत करावी याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. अखेरच्या सत्रामध्ये माहिती आणि तंत्रज्ञान या विषयावर प्रा. डॉ. लखदिवे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख, रामकृष्ण मोरे महाविद्यालय, पुणे यांनी तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. रंगनाथ घनवट, सेवानिवृत अधिकारी, भारतीय वायुदल यांनी सैन्यदलातील नोकरीच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले.

शिबीरार्थी विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था मा.नंदकुमार झावरे सहकारी पतसंस्थेमार्फत सामाजिक कार्यकर्ते श्री.सिताराम खिलारी यांनी केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. तसेच नवोदय विद्यालयाचे प्राचार्य श्री. खंदारे सर, प्राचार्य श्री.अशोकराव खिलारी, श्री. अच्युतराव जगदाळे, प्राचार्य पवार सर व इतरांचेही सहकार्य लाभले. विद्यार्थी आणि शिक्षक यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले व असे कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल संयोजकांना धन्यवाद दिले.

दि. १.१२.२००७ रोजी पारनेर येथे बेलकर मंगल कार्यालयात दुसरे शिबीर मा. अण्णासाहेब हजारे, जेष्ठ समाजसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. गंगारामशेठ बेलकर, माजी सभापती, पंचायत समिती, पारनेर तालुका यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. या शिबिरासाठी पारनेर परिसरातील सुमारे १२०० विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये पारनेर, वाडेगव्हाण, नारायणगव्हाण, लोणी हवेली, बाभुळवाडे इ. गावांतील शाळांचे विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. डॉ. संभाजीराव पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, श्री. मधु जोशी, मा.नगरसेवक, श्री. रंगनाथ घनवट, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते इत्यादी तज्ञ व्यक्तिंनी आपापल्या क्षेत्राशी सबंधित केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच ठरली. या कार्यक्रमासाठी पारनेरचे सरपंच श्री.राजेंद्र तारडे यांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती.

या कार्यक्रमासाठी न्यू इंग्लिश स्कूल, पारनेरचे प्राचार्य



*पारनेर येथील विद्यार्थी मार्गदर्शन शिबिराचे उद्‌घाटनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.आण्णा हजारे, मागे बसलेले - श्री.मधू जोशी, प्रा.डॉ.संभाजी पठारे आणि श्री.रंगनाथ घनवट, मागे टोपी घालून बसलेले कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्री.नरसाळे सर.*



*टाकळी ढोकेश्वर येथील विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरात डावीकडून प्राचार्य आर.आर.खंदारे,श्री.सिताराम खिलारीसर, श्री.विश्वनाथ कोरडे (मागे), प्रा.डॉ.संभाजी पठारे, श्री.केदार शिंदे, श्री.पोखरकर साहेब, प्रा.डॉ.लखदिवे.*

श्री. पाटीलबा जाधव सर तसेच श्री. सखाराम औटी व श्री.अच्युतराव जगदाळे यांचे बहूमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रभाकर नरसाळे सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी श्री. गंगाराम शेठ बेलकर यांनी त्यांचे मंगल कार्यालय मोफत उपलब्ध करुन दिले.

व्याख्यानमालेचा समारोप मा.गितारामशेठ कवाद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निघोज येथील तिसऱ्या शिबीराने झाला. मळगंगा विद्यालयाच्या मैदानावर हे शिबीर आयोजित करण्यात आले. मळगंगा कन्या विद्यालय आणि मळगंगा पतसंस्था, निघोज यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. मा. गितारामशेठ कवाद, अध्यक्ष, मळगंगा पतसंस्था निघोज यांनी या कार्यक्रमामध्ये मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.सुनील रोहकले, जनरल मॅनेजर, आय.सी.आय.सी.आय.बँक, मुंबई, श्री.दामोदरे सर, प्राचार्य, औंध आय.टी.आय., श्री.संजय गांधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जेटकिंग इन्फोटेक लि., श्री.नानासाहेब खोडदे, उद्योजक, पुणे व श्री. मधु जोशी उपस्थित होते.

या व्याख्यानमालेसाठी देवीभोयरे, लोणी मावळा, जवळे इ. भागातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. वरील तज्ञांनी आपापल्या क्षेत्रातील बहुमोल माहितीचा साठा ग्रामीण विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध केला. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधीच होती. श्री. विश्वनाथ कोरडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

अंजना मेडिकल फौंडेशन आणि पारनेर तालुका मित्र मंडळ यांनी अशा प्रकारे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी आयोजित केलेली ही व्याख्यानमाला निश्चितच उपयुक्त ठरली.

ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी श्री.विश्वनाथ कोरडे आणि श्री.हौसाराम घोडके यांनी तालुक्यातील ५५ माध्यमिक विद्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन संबंधितांना व्याख्यानमालेबाबत माहिती दिली होती. पारनेर तालुक्यातील सर्व माध्यमिक/उच्च माध्यमिक विद्यालय प्रमुखांनी तसेच शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. वरील सर्वांचे दोन्ही संस्थांच्या वतीने मी आभार मानतो.

**सुनील पोटे**
*सहसेक्रेटरी, पारनेर तालुका मित्र मंडळ,*
*सेक्रेटरी, अंजना मेडिकल अँड सोशल फौंडेशन*

## अंजना मेडिकल आणि सोशल फौंडेशनच्या वतीने जाहीर केलेल्या पारनेर तालुक्यातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची यादी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | कु. मंडले उषा किसन | इ.१० वी | श्री.केदारेश्वर विद्यालय, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| २) | पवार गणेश भिकाजी | इ.१० वी | श्री.केदारेश्वर विद्यालय, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| ३) | बोरुडे ब्रह्मानंद शंकर | इ.९ वी | श्री.केदारेश्वर विद्यालय, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| ४) | दहिवळ राहुल शिवाजी | इ.८ वी | धर्मनाथ विद्यालय, जवळा | रु.१०००/- |
| ५) | कु. लोंढे प्रतिक्षा सुनिल | इ.६ वी | धर्मनाथ विद्यालय, जवळा | रु.१०००/- |
| ६) | कु. पवार सुनंदा सुर्यकांत | इ.६ वी | जि.प.प्रा.शाळा, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| ७) | आवारी सागर गोरख | इ.३ री | जि.प.प्राथमिक शाळा, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| ८) | खोसे अजय धोंडीभाऊ | इ.६ वी | जि.प.प्राथमिक शाळा, बाभुळवाडे | रु.१०००/- |
| ९) | कु.करंजुले प्रियंका बाळासाहेब | इ.९ वी | न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर | रु.१०००/- |
| १०) | कु.बाळसराफ श्वेताली बाळकृष्ण | इ.६ वी | मुलिकादेवी विद्यालय, निघोज | रु.१०००/- |
| ११) | नाणेकर रसिक अक्षय | इ.६ वी | मुलिकादेवी विद्यालय, निघोज | रु.१०००/- |
| १२) | साबळे महेंद्र पांडुरंग | इ.५ वी | मुलिकादेवी विद्यालय, निघोज | रु.१०००/- |
| १३) | कु. लंके मनिषा लक्ष्मण | इ.५ वी | मुलिकादेवी विद्यालय, निघोज | रु.१०००/- |
| १४) | लामखडे आश्विनी राजेंद्र | इ.७ वी | जनसेवा विद्यालय, वडझिरे | रु.१०००/- |
| १५) | करकंडे विक्रम पोपट | इ.७ वी | जनसेवा विद्यालय, वडझिरे | रु.१०००/- |
| १६) | कु. बुगे सोनाली किसन | इ.११ वी | जनसेवा विद्यालय, वडझिरे | रु.१०००/- |

## अभिनंदन



❋ श्री.भास्करराव भिकाजी शेळके, रा.भोंद्रे यांची सहकार खात्यामध्ये अतिरिक्त सहकार आयुक्त म्हणून पदोन्नती झाली. याशिवाय त्यांच्याकडे भूविकास बँक महाराष्ट्र राज्य या बँकेचे अवसायक म्हणून अतिरिक्त पदभारही आहे.



❋ प्रिंटींग क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरी बद्दल श्री. संजय बाबुराव कदम, रा. पिंपरी जलसेन यांचा रोटरी क्लब ऑफ पुना मिडटाऊन तर्फे सत्कार करण्यात येऊन त्यंना व्होकेशनल अवॉर्ड प्रदान करण्यात आले.



❋ श्री.आनंदराव दादाभाऊ ढोरमले, रा.जातेगाव यांची सुकन्या कु.अपर्णा हिने वाडीया कॉलेजमधून एम.सी.एस. फर्स्ट क्लासमध्ये सुटल्यानंतर एस.एस.सी.बोर्डामध्ये ट्रेनिंग घेतले. त्यानंतर महेंद्र ब्रिटीश टेलिकॉममध्ये रुजु झाल्यानंतर तिला कंपनीने इंग्लंडमध्ये पाठविले आहे.

❋ श्री.किसन शामराव मुळे, रा. किन्ही यांची महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे जिल्हा अधीक्षक (कृषी) या पदावर पदोन्नती झाली.

❋ कुमार संकेत संजय भंडारी, रा. देवीभोयरे यास इयत्ता १०वी मध्ये ७१ टक्के गुण मिळाले.

❋ श्री.वसंतराव रंगनाथ देशमुख, रा. जवळे यांची भैरवनाथ विद्या मंदीर पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे या उच्च माध्यमिक विद्यालयात प्राचार्य म्हणून पदोन्नती झाली.

❋ मंडळाचे देणगीदार श्री.अविनाश दशरथ भांडवलकर, यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत 'अन्न निरीक्षक' या पदावर पदोन्नती झाली.

❋ डॉ.प्रा.बाळकृष्ण नारायण झावरे, रा. भोंद्रे यांना दि. ५ सप्टेंबर २००७ रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' मिळाला.

❋ ॲड.पोपटराव भिकाजी सोबले, रा. सोबलेवाडी यांची मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीयल ॲंड ॲग्रीकल्चर या ख्यातनाम संस्थेच्या कोअर कमिटी ऑफ फार्मर्स ॲंड फुड इंडस्ट्रीजवर सदस्य म्हणून नेमणूक झाली. तसेच त्याच संस्थेवर लिगल ॲडव्हायजर फॉर फुड

## दुःखद निधन

❋ श्रीमती पद्माबाई दिगंबर वैद्य, रा.मांडवे खुर्द यांचे दिनांक २८.०७.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.बबनराव बंडूजी साळवे गुरुजी, रा.हंगे यांचे दि.०३.०८.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.हरकचंद चंदनमल कटारिया, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे दि.२७.०९.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.एकनाथ बाबुराव इंगळे, रा.नारायण गव्हाण यांचे दि.१०.१०.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.नाथू किसन मदगे, रा.म्हसे यांचे दि. ११.१०.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.गणपतराव मारुती काळे, रा.पिंपरी जलसेन यांच्या मावशी श्रीमती साळाबाई नारायण बोरुडे यांचे वयाच्या ११० व्या वर्षी दि.१६.१०.२००७ रोजी निधन झाले.

❋ प्रा.भगवान काशिनाथ काळे, रा.गोरेगाव यांचे दिनांक १९.१०.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.कोंडाजी रामभाऊ ठुबे, रा.पारनेर यांचे दि.२५.१०.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.पर्वतराव दादाराम करंजुले, रा.कडूस पाडळी यांचे दि.२६.११.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ श्री.फकीरा गोविंदराव हरेल गुरुजी, रा.हिवरे कोरडा यांचे दि.२७.११.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ मंडळाचे कार्यकारीणी सदस्य श्री.अशोक विश्वनाथ वाबळे, रा.निघोज यांचे आजोबा श्री.काशिनाथ दावबा वाबळे रा.खडकवाडी यांचे दि.०१.१२.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ डॉ.शहाबुद्दिन नूरमहंमद पठाण, कुलगुरु, संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, रा.पिंपरी जलसेन यांच्या मातोश्री श्रीमती अमिनाबी यांचे दि.०३.१२.२००७ रोजी दुःखद निधन झाले.

❋ डॉ.पांडुरंग तुकाराम गायकवाड, रा. नांदुर पठार यांच्या मातोश्री श्रीमती सोनाबाई तुकाराम गायकवाड यांचे

**'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली।**
**नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले।**
**वित्ताविना शुद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले।।'**

**- महात्मा ज्योतिबा फुले**

# नांदा सौख्य भरे

- श्री.विनायक गोविंद अत्रे, रा.म्हसे यांची सुकन्या सौ.प्रज्ञा व श्री.जयंत घमंडी रा.नाशिक यांचे सुपुत्र चि.प्रितिश यांचा शुभविवाह दिनांक २०.११.२००७ रोजी संपन्न झाला.
- कै.विष्णु लक्ष्मण रोहकले, रा.भाळवणी यांचे सुपुत्र चि.विजयकुमार व श्री.माधवराव भागुजी गवळी रा.अपधूप यांची सुकन्या सौ.सीमा यांचा शुभविवाह दि.२४.११.२००७ रोजी संपन्न झाला.
- श्री. मारुती विष्णू दिघे, वडझिरे यांची सुकन्या सौ.दिपाली व श्री.रोहिदास रंगनाथ झंजाड, रा.पारगाव, ता.जुन्नर यांचे सुपुत्र चिरंजीव संजय यांचा शुभविवाह दि.२५.११.२००७ रोजी संपन्न झाला.
- प्राचार्य रामराव विश्वनाथ शेरकर, रा.पारनेर यांचे सुपुत्र चि.रविकिरण व श्री.दादासाहेब त्रिंबक बोठे, रा.वाळकी, ता.नगर यांची सुकन्या सौ.ज्योती यांचा शुभविवाह दिनांक २५.११.२००७ रोजी संपन्न झाला.
- श्री.बाळासाहेब हरिभाऊ एरंडे, रा.वडझिरे यांची सुकन्या सौ.सुवर्णा उर्फ संध्या व सखाराम बाबुराव बळे, ह.मु.श्रीगोंदा, जि.नगर यांचे सुपुत्र चि.प्रवीण यांचा शुभविवाह दि.२५.११.२००७ रोजी संपन्न झाला.
- श्री.शिवाजी गणपत सोमवंशी, रा.जाधववाडी यांचे सुपुत्र चि.गणेश व श्री.गणेश दयानंद शिंदे, रा.पुणे यांची सुकन्या सौ.शीतल यांचा शुभविवाह दि.२.१२.२००७ रोजी संपन्न झाला.
- डॉ.जवाहर चंदनमलजी भळगट, रा.कान्हूर पठार यांचे सुपुत्र डॉ.स्वप्नील व डॉ.अजितजी लालचंदजी मेहता यांची सुकन्या डॉ. सौ. पायल यांचा शुभविवाह दि.३.१२.२००७ रोजी संपन्न झाला.
- श्री.बाळासाहेब किसन रांधवन, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र डॉ.मारुती व श्री.हिरामण राजाराम वाडकर, रा.हडपसर, पुणे यांची सुकन्या डॉ.सरोज यांचा शुभविवाह दि.४.१२.२००७ रोजी संपन्न झाला.
- श्री.जवाहरलाल पोपटलाल ओस्तवाल, रा.जातेगाव यांची सुकन्या सौ.पुनम आणि श्री.प्रकाशचंदजी बंब यांचे सुपुत्र चि. प्रितमकुमार यांचा शुभविवाह दि.४.१२.२००७ रोजी संपन्न झाला.
- कै.एकनाथ बाबुराव इंगळे, रा.सुपा यांचे सुपुत्र चि.सुधीर व श्री.अजित लक्ष्मणराव रोकडे, रा.लोणी धामणी, ता.आंबेगाव जि.पुणे यांची सुकन्या सौ.नयना

# अनुकरण करावे असे काही...

- श्री.पोपटराव सोनाजी देशमुख, रा.पळवे यांनी त्यांचे पिताजी कै.सोनाजी राघोजी देशमुख उर्फ मास्तर यांचे स्मरणार्त रु.५०००/- देणगी दिली.
- श्री.मिलींद मनोहर भालेराव, रा.पानोली यांनी त्यांचे पिताश्री कै.मनोहर गजानन भालेराव यांचे स्मरणार्थ रु.५०००/- देणगी दिली.
- श्री.नामदेव मारुती साबळे, रा.रुई छत्रपती यांनी त्यांच्या आत्या श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर (पुणे) यांच्या दि.१६.८.२००७ च्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त रु.११००/- देणगी दिली.
- ॲड.यशवंत पंढरीनाथ विप्रदास, रा.गांजीभोयरे यांनी त्यांचे काका (चुलते) कै.बबनराव काशिनाथ विप्रदास यांच्या दिनांक ३०.११.२००७ रोजीच्या पुण्यतिथीनिमित्त रु.२०००/- देणगी दिली.
- डॉ.प्रकाश पोपटराव शिंदे, रा.पानोली यांनी त्यांचे ज्येष्ठ बंधू कै.रावसाहेब पोपटराव शिंदे यांचे स्मरणार्थ रु.५०००/- देणगी दिली.
- श्री.शंकर तुकाराम ठुबे, रा.कान्हूर पठार यांना दि.१.५.२००७ रोजी महाराष्ट्र दिनी महाराष्ट्र शासनातर्फे पुणे जिल ातील उत्कृष्ठ तलाठी म्हणून गौरवपत्र, शाल, श्रीफळ व रोख रु.५०००/- देऊन गौरविण्यात आले. त्या पुरस्काराची रक्कम रु.५०००/- त्यांनी त्यांच्या पत्नी सौ.सुजाता यांना भेट दिली. सौ. सुजाता यांनी सदर रक्कमेची मंडळास देणगी दिली.
- श्री.बन्सीलाल पन्नालाल बाठीया, रा.टाकळी ढोकेश्वर यांनी त्यांची नात कु. पुजा नितीनकुमार बाठीया हिच्या दि.५.१.२००८ रोजीच्या वाढदिवसानिमित्त मंडळास रु.५००१/- ची देणगी दिली.
- श्री.गणपतराव मारुती काळे, रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांच्या मावशी कै. साळाबाई नारायण बोरुडे यांचे स्मरणार्थ मंडळास रु.१११०/- देणगी दिली.

# भावपूर्ण निरोप

- श्री.आनंदराव गणपतराव म्हस्के, रा.म्हस्केवाडी हे केंद्र सरकारच्या हॉस्पिटलमधून एक्स-रे टेक्नीशियन या पदावरुन दि.१.९.२००७ रोजी सेवानिवृत्त झाले.
- कुलसचिव श्री. पोपटराव जबाजी ठुबे, रा.कान्हूर पठार हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर येथून दि.३०.९.२००७ रोजी सेवानिवृत्त झाले.
- श्री.अशोक देवीचंद मुथीयान, रा.अळकुटी हे रंगनाथ स्वामी शिक्षण संस्था आणे, ता.जुन्नर या संस्थेच्या भैरवनाथ विद्यालय भोसरी, पुणे येथून दि. ३१.१०.०७ रोजी पर्यवेक्षक या पदावरुन सेवानिवृत्त झाले.

# Transpacific Certifications (Maharashtra)

TRANSPACIFIC CERTIFICATIONS LTD

TCL

Accreditotion by Joint Accreditotion
System of Australia and New Zealand
Accreditotion No. s2640303 IN for
QMS & National Accreditition Board of
Certification Bodies (NABCB)
Acc No. QMO18

**ISO9001 : 2000**
**ISO14000 : 2004**
**HACCP**
**ISO 22000**
**CE Marketing**
**ISI**
**USFDA**

Praveen Dighe
B.Sc., M.B.A.(Mktg.& Fin.)
Lead Auditor (IRCA, UK)
**Director**
**Cell : 9890580236**

Shreeram Darshan Phase- 2 | B - 1/ 24
Opp. Sawant Vihar |Katraj - 411046
Tel - 020 - 24371735
E mail - punetclcertifications@gmail.com
website - www.tclcertifications.com

# -: सूचना :-

मंडळाकडे माहिती पाठविल्यास संवाद त्रैमासिकातून खालील बाबींना प्रसिद्धी देण्यात येते.

१) पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तीबाबत अवश्य कळवावे.

२) आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवाद मध्ये छापली जाते. त्याकरिता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

३) आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे जेणेकरुन इतर सुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

४) संवाद वाचून आपली प्रतिक्रिया कळवावी.

५) ज्यांनी शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय कामामध्ये भरीव कामगिरी केली आहे अशांची माहिती फोटोसह पाठवावी.

६) विद्यार्थ्यांच्या दहावी-बारावी, इंजिनियरींग, मेडिकल व इतर सर्व शाखांच्या परीक्षांचे मार्कस् कळविल्यास विद्यार्थ्यांचे अभिनंदन संवाद मधून करण्यात येईल.

७) मंडळातर्फे वैद्यकीय मदत दिली जाते.

८) गरीब विद्यार्थ्यांना आर्थीक मदत केली जाते.

९) कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता फोन नंबर त्वरीत कळवावा.

तेव्हा कंटाळा करु नका, लगेच फोन किंवा पत्राने आपली व इतरांचीसुद्धा माहिती कळवा.

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार दुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री.सुनील तोटे यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ३९५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून ए-१/१ यशोधन सोसायटी, चिंतामणीनगर भाग-२, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०